# Grauer & Weil (India) Limited

CHEMICALS | ENGINEERING | PAINTS | LUBRICANTS | REAL ESTATE

**Date : 15-08-2025**

To,
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400001

**Re : Security Code No. 505710**

**Subj.: Submission of newspaper publication under Regulation 47 of SEBI Listing Regulations, 2015**

Dear Sir / Madam,

With reference to the above mentioned subject and Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find attached herewith Copy of the Publication of the Unaudited Financial Results of the Company for the Quarter ended 30th June, 2025, as approved by the Board in their Meeting held on 13th August, 2025, in the newspapers viz. Economic Times in English and Maharashtra Times in Marathi language, on 15th August, 2025.

Kindly take the same on the records and acknowledge the receipt.

Thanking you

Yours faithfully,

FOR GRAUER & WEIL (INDIA) LIMITED

CHINTAN K. GANDHI
COMPANY SECRETARY



Regd. Office: Growel Corporate, Akurli Road, Kandivli (E),
Mumbai (Maharashtra) 400 101, India
T +91 22 66993000 F +91 22 66993010 E [illegible]@growel.com
CIN L74999MH1957PLC010975

# HZL Readies Plan to Make ₹65kcr in Yearly Revenue

## Aims to double output to 2 m tonnes

**Nikita Periwal**



**Mumbai:** Hindustan Zinc (HZL), an integrated producer of zinc and silver, is targeting annual revenue in the range of ₹62,000 crore to ₹65,000 crore once its production capacity doubles to 2 million tonnes, according to an investor presentation.

The company, a subsidiary of Anil Agarwal-owned Vedanta, did not say by when it would double production capacity. It had recorded ₹34,083 crore revenue in FY25.

At double the capacity, its earnings before interest, tax, depreciation and amortisation is likely to be in the range of ₹34,000 crore to ₹36,000 crore, while the cost of production is likely to be $1,000 per tonne, the company said in its presentation.

For FY25, Hindustan Zinc clocked in an Ebitda of ₹17,465 crore, while its cost of production stood at $1,052 per tonne.

At double output capacity, the production of silver is expected to rise to 1,500 tonnes from around 700 tonnes now. Silver is recovered as a by-product from the smelting and refining of zinc.

In June, the company had announced a capital expenditure of ₹12,000 crore to enhance capacity at its smelter in Debari by 250,000tonnes, taking it toa total of 1.38 million tonnes. This capacity is expected to come on board in 36 months after the expansion starts.

After its initial phase of expanding capacity by 250,000 tonnes, Hindustan Zinc is eyeing a revenue of ₹40,000 – ₹42,000 crore, and an Ebitda of ₹21,000 –₹22,000 crore.

Chief executive officer Arun Misra had told ET in June that the company would announce new expansion plans over the next few months.

On Thursday, shares of the company ended 0.8% lower on the BSE at ₹426.5.

# JSW Cement Eyes Top-2 Spot

**Mumbai:** JSW Cement, which debuted on exchanges on Thursday, aims to be among the top two cement producers in thecountry, managing director Parth Jindal said.

"To be a part of the JSW Group, we are not allowed to be in the top five or the top 10. If I have to have a bed in my house where I stay with my father then I have to dream to be in the top two," he said. JSW Steel, the flagship company of the Sajjan Jindal-owned JSW Group, is currently the largest producer of steel in the country.

Shares of JSW Cement listed at an over 4% premium to its issue price of ₹147.

After touching an intraday high of ₹154.70, the shares ended 0.9% lower at ₹146.05 apiece on the BSE.

The company had a market capitalisation of ₹19,911 crore as on Thursday. It is currently the ninth largest producer of cement in the country with the capacity to produce 20.60 million tonnes of cement annually. —**Our Bureau**


## GRAUER & WEIL (INDIA) LIMITED

GROWEL SINCE 1957

Regd. Office: Akurli Road, Kandivali (East), Mumbai 400 101
CIN - L74999MH1957PLC010975

### Statement of Financial Results for the Quarter ended June 30, 2025

Rupees In Lacs

| Sr. No. | Particulars | Standalone Results | | | | Consolidated Results | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year Ended | Quarter ended | | | Year Ended |
| | | 30-Jun-25 | 31-Mar-25 | 30-Jun-24 | 31-Mar-25 | 30-Jun-25 | 31-Mar-25 | 30-Jun-24 | 31-Mar-25 |
| | | Un-audited | Audited | Un-audited | Audited | Un-audited | Audited | Un-audited | Audited |
| 1 | Total Income from Operations | 24,932 | 33,797 | 26,179 | 112,756 | 25,326 | 34,011 | 26,409 | 113,369 |
| 2 | Net Profit for the period before tax | 5,844 | 3,440 | 6,670 | 20,945 | 5,840 | 3,435 | 6,668 | 20,959 |
| 3 | Net Profit for the period after tax | 4,365 | 2,577 | 5,070 | 15,700 | 4,361 | 2,574 | 5,071 | 15,718 |
| 4 | Total Comprehensive income for the period (Comprising Profit for the period after tax and Other Comprehensive Income after tax) | 4,248 | 2,591 | 5,024 | 15,652 | 4,244 | 2,591 | 5,025 | 15,673 |
| 5 | Equity Share Capital | 4,534 | 4,534 | 4,534 | 4,534 | 4,534 | 4,534 | 4,534 | 4,534 |
| 6 | Earnings Per Share (of Re. 1/- per share) | | | | | | | | |
| | (1) Basic | 0.96 | 0.57 | 1.12 | 3.46 | 0.96 | 0.57 | 1.12 | 3.47 |
| | (2) Diluted | 0.96 | 0.57 | 1.12 | 3.46 | 0.96 | 0.57 | 1.12 | 3.47 |

**Notes :**

1. The above results were reviewed by the Audit Committee and taken on record by the Board of Directors at their meeting held on August 13, 2025.
2. This statement has been prepared in accordance with Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (Ind AS) prescribed under section 133 of the Companies Act, 2013 and other recognised accounting policies to the extent applicable.

By Order of the Board
Sd/-
Nirajkumar More
Managing Director

Place: Mumbai
Date: August 13, 2025



## S. E. RAILWAY - E-TENDER

**TENDER FOR 'E' PROCUREMENT SYSTEM**

**Tender Notice No. PCMM/GENL/TP/2025/31** **Date: 14/08/2025**

The Principal Chief Materials Manager, South Eastern Railway, Hd. Qrs. Office (5th Floor), New administrative Building, 11, Garden Reach Road, Kolkata-700043 for and on behalf of the President of India invites open E-tenders which have been uploaded on website www.ireps.gov.in as follows.All the tenders will be closed at 14.00 hrs.

| Sl. No. | Tender No. | Due Date | Brief Description | Qty. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 45253203 | 02/09/25 | Hermetically sealed scroll compressor for RMPU Coaches etc. | 173 Nos. | 1,53,060.00 |
| 2 | 60250022 | 21/08/25 | Manufacturing and supply of Galvanized Plate Screw etc. | 80000 Nos. | 88,740.00 |
| 3 | 42253062A | 28/08/25 | 20 Watt Led Street Light Luminaire. | 13347 Nos. | 1,19,070.00 |
| 4 | 65255002A | 29/08/25 | HABD (Hot Axle Box Detector) system | 09 Nos. | 1,03,500.00 |
| 5 | 56255183 | 16/09/25 | Running Contract for supply of Relay AC Immune, plug-in-type style QL 1. | 1620 Nos. | 1,14,700.00 |
| 6 | KGP-WS-TC2026-28 | 11/09/25 | Transport Contract for transportation of Railway materials on anywhere to anywhere basis etc. | As per Website | 2,44,500.00 |
| 7 | 33253060 | 23/10/25 | Flex Ball Cable Complete Set | 73 Nos. | 346870.00 |
| 8 | 33255016 | 22/09/25 | Supply Installation and Commissioning of revised wiring with Modified Junction Boxes. | 50 Set. | 203550.00 |

Interested tenderers may visit website www.ireps.gov.in for full details/description/specification of the tenders and submit their bids online. In no case manual tenders for these items will be accepted. **N.B: Prospective Bidders may regularly visit www.ireps.gov.in to participate in all other tenders & any corrigendum published thereafter.** (PR-527)



## MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**MAHARASHTRA STATE POWER GENERATION COMPANY LTD.**
**Renewable Energy (Projects & Planning)**

**EXPRESSION OF INTEREST**

Maharashtra State Power Generation Co. Ltd. invites Expression of Interest (EOI) from **various EPC agencies having technical experience in developing solar power projects** for the remaining/balance work and supply of material for the development of a 62 MW solar power project at Paras. The EOI is invited for the remaining/balance scope of work and supply of material for the contracted 62 MW solar power project at Paras - for Design, Engineering, Supply, Erection, Testing, and Commissioning of a 62 MW AC cumulative capacity Crystalline Solar PV Technology Grid-Interactive Solar PV Power Plant with associated HT overhead transmission line/underground cable up to the point of interconnection, including 5 years' Operation & Maintenance on an EPC basis at Village: Paras, Taluka: Balapur, Dist.: Akola, Maharashtra

Interested applicants may submit their budgetary offer proposal for estimation purposes after visiting the site at their own cost.

The offer shall be submitted along with the following documents.

1. Specifying company profile along with Name of Directors.
2. Experience as per Qualifying Requirements
3. Site assessment report.

- Last date for submission of EoI/Application in soft copy through e-mail (cespgd@mahagenco.in/dycespgd@mahagenco.in):-- **08/September/2025 till 11:00 Hrs.**
- Last date for submission of EoI/Application in hard copies in sealed envelope: – **08/September/2025 till 17:00 Hrs.**

**Submit hard copy to:**
**O/o Chief Engineer (RE-P&P),**
**4th Floor, A- Wing, HDIL Towers, Bandra (East), Mumbai – 400 051. Tel: 022-69415353/35/ Mob No. + 918879770745 / + 917738070061.**

Details of the EoI document is available on MAHAGENCO's website (www.mahagenco.in) for free download.

**Note:** This budgetary offer proposal is for estimation purposes only and does not create any right to receive a Letter of Award (LoA).

Sd/-
**Date :- 15/08/2025** **Chief Engineer-RE (P&P)**





# नाकर्त्या यंत्रणाच कारणीभूत

## भटके कुत्रेप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा ठपका; निकाल राखला

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'दिल्ली-एनसीआरमधील भटक्या कुत्र्यांच्या संपूर्ण समस्येचे कारण स्थानिक प्राधिकरणांचा नाकर्तेपणा हेच आहे. या यंत्रणांनी काहीही केले नाही', असा ठपका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी ठेवला.

रस्त्यांवरील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानांमध्ये स्थलांतरित करण्याचे आदेश देणाऱ्या वेगळ्या खंडपीठाच्या निकालानंतर, भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्वयंप्रेरणेने दाखल केलेल्या खटल्याचा निर्णय देण्यासाठी न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेले नवीन खंडपीठ स्थापन करण्यात आले आहे. या खंडपीठाने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्यासह इतरांचे म्हणणे ऐकून घेतले आणि वेगळ्या खंडपीठाच्या ११ ऑगस्टच्या निर्णयावर स्थगिती देण्याच्या अंतरिम विनंतीवर निर्णय राखून ठेवला.

दिल्ली-एनसीआरमधील सर्व भटक्या कुत्र्यांना रस्त्यावरून आश्रयस्थानांमध्ये स्थलांतरित करण्याचे आदेश न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ११ ऑगस्ट रोजी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले होते. सुरुवातीला पाच हजार कुत्र्यांसाठी आश्रयस्थान तयार करण्याची सूचना खंडपीठाने अधिकाऱ्यांना केली होती.

'भटक्या कुत्र्यांची संपूर्ण समस्या स्थानिक प्राधिकरणांच्या निष्क्रियतेमुळे निर्माण झाली आहे. तुम्ही संसदेत नियम तयार करता, पण त्यांची अंमलबजावणी केली जात नाही', असा ठपका नवीन खंडपीठाने गुरुवारी ठेवला. भारतीय प्राणी कल्याण मंडळ, स्थानिक प्राधिकरणे आणि सरकारनेदेखील काहीही केले नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. तसेच, न्यायालयासमोर येणाऱ्या आणि हस्तक्षेप दाखल करणाऱ्या प्रत्येकाला जबाबदारी स्वीकारावी लागेल, असेही बजावले.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी देशातील कुत्रा चावण्याच्या आकडेवारीचा संदर्भ दिला. 'श्वानदंशामुळे मुले मरत आहेत. सन २०२४मध्ये देशभरात सुमारे ३७.१५ लाख कुत्रा चावण्याच्या घटना नोंदवल्या. हे प्रमाण दररोज सरासरी दहा हजार इतके आहे. कोणीही प्राणीद्वेष्टा नाही. सापांच्या शंभर प्रजातींपैकी फक्त चार विषारी आहेत; पण आपण त्यांना घरात ठेवत नाही. कोणीही असे म्हणत नाही की, कुत्र्यांना मारणे आवश्यक आहे. त्यांना केवळ मानवी वस्त्यांपासून वेगळे करावे लागेल', असेही मेहता म्हणाले.

कपिल सिबल यांच्यासह ज्येष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांनीही सर्वोच्च न्यायालयाच्या ११ ऑगस्टच्या आदेशात दिलेल्या काही निर्देशांवर स्थगिती मागितली. एका स्वयंसेवी संस्थेच्या वतीने हजर असलेले सिब्बल यांनी विचारले की, यंत्रणांनी कुत्र्यांची नसबंदी का केली नाही आणि त्यांच्यासाठी पुरेसे आश्रयस्थान का बांधले नाहीत.

'कृपया आदेशाचा कोणता भाग आक्षेपार्ह आहे ते सांगा. हे प्रकरण आज मुख्य न्यायाधीशांसमोर तातडीच्या उल्लेखावर आणि विशेष खंडपीठ स्थापन करण्यासाठी सूचीबद्ध केले गेले आहे', असे खंडपीठ म्हणाले.

ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा म्हणाले की, ११ ऑगस्टच्या आदेशाने उच्च न्यायालयांना तसेच निर्देश देण्यास सुरुवात करण्याचा मार्ग मोकळा केला आहे.



### 'वाद नको, तोडगा हवा'

**नवी दिल्ली :** 'दिल्ली-एनसीआरमधील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. यावर वाद करण्याची गरज नाही, कारण श्वानदंशानंतर रेबीजमुळे मुले मरत आहेत. कुत्र्यांच्या नसबंदीमुळे रेबीज थांबत नाही', असे दिल्ली सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. 'मांस, मटण, चिकन इत्यादी खाणारे लोक आता प्राणीप्रेमी म्हणून उभे राहून आक्षेप घेत आहेत', असेही ते म्हणाले.

### स्वयंसेवी संस्थांनाही सुनावले

'एकीकडे नागरिक त्रस्त आहेत आणि दुसरीकडे प्राण्यांनाही सन्मानाने वागवले जावे अशी प्राणीप्रेमींची अपेक्षा आहे. स्वयंसेवी संस्था केवळ आरडाओरड करतात, पण त्यांना काय करायचे हे माहीत नाही. प्राणी जन्म नियंत्रण नियमाची अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांनी आधीच न्यायालयात येणे आवश्यक होते. मात्र, या संस्था काहीही करत नाहीत', या शब्दांत खंडपीठाने प्राणीप्रेमी स्वयंसेवी संस्थांनाही सुनावले.

# 'वनताराविरोधी याचिका संदिग्ध'

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'वनतारा' या वन्यप्राण्यांच्या बचाव आणि पुनर्वसन केंद्रात बंदिस्त असलेल्या हत्तींना मूळ मालकांकडे परत पाठवण्यासाठी देखरेख समिती स्थापन करण्याची मागणी करणारी याचिका पूर्णतः अस्पष्ट असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले.

'वनतारा यांच्यावर आरोप करताना याचिकेत त्यांना पक्षकारच केलेले नाही,' असे न्या. पंकज मित्तल आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ता ॲड. सी. आर. जया सुकीन याना सांगितले. 'वनतारा'चा याचिकेत समावेश करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला दिले. 'तुम्ही अशांवर आरोप करत आहात, ज्यांना पक्षकारच केलेले नाही. तुम्ही त्यांना प्रतिवादी केलेले नाही. तुम्ही त्यांना विनंती करा आणि मग आमच्याकडे परत या, आम्ही पाहू,' असे सांगत खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी २५ ऑगस्ट रोजी ठेवली. सर्वोच्च न्यायालयाने याच याचिकेसोबत एक समान स्वरूपाची याचिकाही संलग्न केली आहे. ही याचिका यापूर्वीच भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासमोर तातडीच्या सुनावणीसाठी सूचीत समाविष्ट करण्यात आली होती.

# वार्षिक फास्टॅग पास आजपासून सुरू

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

खासगी कार, जीप आणि व्हॅनसाठी तीन हजार रुपयांचा वार्षिक महामार्ग टोल पास आज, शुक्रवारपासून सुरू करण्यात येणार आहे. या पासद्वारे एका वर्षात महामार्गावरील २०० टोल बूथ पार करता येतील.

हा पास लागू होण्यापूर्वी, केंद्र सरकारने फास्टॅग आधारित वार्षिक पाससाठी आगाऊ बुकिंग सुरू केले आहे. यामुळे वापरकर्ते एकाच वेळी तीन हजार रुपयांचे रिचार्ज करून वर्षभरात २०० टोल बूथवरून प्रवास करू शकतील. हा वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी राजमार्ग यात्रा या ॲपवर खास लिंक देण्यात आली आहे. तसेच, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्या अधिकृत वेबसाइटवरही ही लिंक उपलब्ध असेल.

हा पास कार, जीप, व्हॅन अशा बिगरव्यावसायिक खासगी वाहनांसाठी आहे. यामुळे वारंवार फास्टॅग कार्ड रिचार्ज न करता राष्ट्रीय महामार्गांवर अखंडित प्रवास करणे शक्य होईल, असा दावा केंद्र सरकारने केला आहे.

### खासगी वाहनांसाठी तीन हजार रुपये शुल्क




**टोलविषयक नियमांबाबत**

- दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे सारख्या 'क्लोज्ड टोलिंग' महामार्गांवर, जिथे टोल फक्त बाहेर पडण्याच्या ठिकाणी घेतला जातो, तिथे एकदा प्रवेश आणि निकास (बाहेर पडणे) एक फेरी (ट्रिप) मानली जाईल.
- दिल्ली-चंडीगडसारख्या 'ओपन टोलिंग' मार्गांवर, प्रत्येक टोल प्लाझा पार करणे म्हणजे एक स्वतंत्र फेरी (ट्रिप) मानली जाईल.
- एका वर्षात २०० ट्रिपची मर्यादा संपल्यावर, हा पास पुन्हा रिचार्ज करता येईल.
- ज्यांच्याकडे आधीच फास्टॅग आहे, त्यांना नवीन फास्टॅग घेण्याची गरज नाही.
- हा वार्षिक पास फक्त राष्ट्रीय महामार्ग आणि राष्ट्रीय एक्सप्रेसवे वरील टोल प्लाझावरच वैध असेल.

# 'भारतीय परिचारिकेला धोका नाही'

वृत्तसंस्था, नवी दिल्ली



येमेनमध्ये हत्या प्रकरणात मृत्युदंड ठोठावण्यात आलेली भारतीय परिचारिका निमिषा प्रिया हिला तत्काळ धोका नाही, अशी माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली आहे. 'पीडित कुटुंबाशी चर्चा सुरू असून, तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे,' असे 'सेव्ह निमिषा प्रिया इंटरनॅशनल अॅक्शन कौन्सिल'च्या वकिलांनी सांगितले. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी आठ आठवड्यांनी ठेवली आहे.

केरळमधील पलक्कड येथील ३८ वर्षीय प्रिया २०१७मध्ये येमेनी व्यावसायिक भागीदार तलाल अब्दो महदीच्या हत्येत दोषी ठरली होती. २०२०मध्ये तिला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आणि २०२३मध्ये अंतिम अपील फेटाळले गेले. ती सध्या साना येथील तुरुंगात आहे.

'प्रियाच्या सुरक्षिततेसाठी राजनैतिक प्रयत्न सुरू आहेत. १६ जुलै रोजी होणारी तिची फाशी स्थगित करण्यात आली होती. तसेच शरिया कायद्यानुसार 'ब्लड मनी' देऊन पीडित कुटुंबाची माफी मिळवण्याची शक्यता तपासली जात आहे,' असे केंद्र सरकारने न्यायालयाला कळवले आहे. याचिकाकर्त्यांनी सरकारला मृताच्या कुटुंबाशी चर्चा करण्यासाठी शिष्टमंडळ पाठवण्याची विनंती केली आहे. प्रियाची आई आधीच यासाठी येमेनमध्ये गेली आहे. भारत येमेनी अधिकाऱ्यांशी आणि मित्र देशांशी परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढण्यासाठी संपर्कात आहे.

# 'अपोलो'मध्ये 'शोले'साठी रांगा

चिंतामणी पत्की
Chintamani.Patki@timesofindia.com

'हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं'... 'एक-एक को चुन-चुन के मारूंगा'... 'इतना सन्नाटा क्यों है भाई'... 'चल धन्नो, आज तेरी बसंती की इज्जत का सवाल है'... 'बसंती इन कुत्तों के सामने मत नाचना'... 'ये हाथ नहीं फांसी का फंदा है'... 'ठाकूर न झुक सकता है, न टूट सकता है, ठाकूर सिर्फ मर सकता है'... 'कितने आदमी थे?'... 'मैंने आपका नमक खाया है सरदार... अब गोली खा..'

अशा संवादाने भारतीय चित्रपटसृष्टीत अजरामर झालेला 'शोले' आज, स्वातंत्र्यदिनी पन्नास वर्षांचा झाला. १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झालेला 'शोले' देशभरात आपटला. मात्र, नंतर त्याने नवनवे विक्रम प्रस्थापित केले. आज बंद पडलेल्या शहरातील 'अपोलो टॉकीज'मध्ये तेव्हा तिकिटासाठी रांगा लागल्या होत्या.

'शोले' प्रदर्शित झाल्यानंतर नकारात्मक प्रतिक्रिया आल्या होत्या. मात्र, नंतर कलाकारांच्या अभिनयाने लोकांच्या मनावर गारूड निर्माण केले. सलीम-जावेद यांचे संवाद नंतर इतके लोकप्रिय झाले, की ते लोकांना तोंडपाठ झाले. चार-पाच वर्षांच्या मुलांवरही या चित्रपटाने गारूड केले. सोमवार-रास्ता पेठेतील 'अपोलो टॉकिज'मध्ये तिकिटांसाठी रांगा लागल्या होत्या,' अशी आठवण चित्रपट अभ्यासक सुलभा तेरणीकर यांनी सांगितली. 'अमिताभ हा कविपुत्र; तसेच जावेद अख्तर कवी; तरीही या चित्रपटात काव्याला स्थान नाही. हिंदी चित्रपटातून काव्याचे महत्त्व कमी होण्यास 'शोले'पासून सुरुवात झाली,' असे निरीक्षण नोंदवतात.

### 'शोले' आज, स्वातंत्र्यदिनी झाला पन्नास वर्षांचा



'मी पंचविशीत असताना (१९७५मध्ये) 'शोले' प्रदर्शित झाला. चित्रपटप्रेमींच्या या शहराने 'शोले'वर भरभरून प्रेम केले. 'नटराज', 'अपोलो', 'राहुल', 'अलंकार' या चित्रपटगृहांमध्ये 'शोले'साठी गर्दी व्हायची. मात्र, 'मंगला टॉकीज' १९७७मध्ये म्हणजे चित्रपटाच्या रिलीजनंतर दोन वर्षांनी सुरू झाले. त्यामुळे आमच्याकडे 'शोले' प्रदर्शितच झाला नाही,' असे 'मंगला थिएटर'चे संचालक अरविंद चाफळकर यांनी सांगितले. 'कर्वे रस्त्यावरील 'अलुरकर' आणि लक्ष्मी रस्त्यावरील 'पंकज' या कॅसेटच्या दालनात 'शोले'च्या संवादाच्या कॅसेट हातोहात खपल्या जात होत्या. स्वतः अलुरकर यांनी या विक्रीचे अनेक किस्से सांगितले आहेत,' अशी माहिती संदर्भतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांनी दिली.

**सर्वाधिक यशस्वी चित्रपटाचा मान**

- 'शोले' भारतातील हिंदी भाषिक चित्रपटांच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी मानला गेलेला चित्रपट आहे.
- मोठ्या पडद्यावर हा सिनेमा लागला किंवा दूरचित्रवाणीवर 'सर्फिंग' करताना 'शोले' दिसला, तर चित्रपटप्रेमी आजही तो पाहतातच.



## THIRUMALAI CHEMICALS LIMITED

REGD. OFFICE : THIRUMALAI HOUSE, PLOT NO.101/102, SION MATUNGA ESTATE, ROAD NO.29, SION (EAST), MUMBAI 400 022.
RESPONSIBLE CARE® OUR COMMITMENT TO SUSTAINABILITY
CIN: L24100MH1972PLC016149, Tel.No.: 022-24017841, Fax No.: 022-24011699
Email Id: thirumalai@thirumalaichemicals.com, Website: http://www.thirumalaichemicals.com

### UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30.06.2025

( ₹ IN LAKHS )

| PARTICULARS | STANDALONE | | | CONSOLIDATED | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Quarter Ended 30.06.2025 | Year Ended 31.03.2025 | Quarter Ended 30.06.2024 | Quarter Ended 30.06.2025 | Year Ended 31.03.2025 | Quarter Ended 30.06.2024 |
| | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited |
| Total income from Operations | 45,253 | 218,327 | 53,734 | 45,225 | 207,011 | 55,796 |
| Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (1,818) | 10,451 | 3,808 | (6,437) | (4,085) | 1,091 |
| Net Profit / (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (1,818) | 10,451 | 3,808 | (6,437) | (4,085) | 1,091 |
| Net Profit / (Loss) for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (1,383) | 8,221 | 2,814 | (5,996) | (4,610) | 509 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (217) | 13,295 | 7,777 | (5,052) | 1,970 | 6,380 |
| Equity Share Capital | 1,024 | 1,024 | 1,024 | 1,024 | 1,024 | 1,024 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the last financial year | 109,642 | 109,642 | 82,603 | 114,543 | 114,543 | 91,022 |
| Earnings Per Share (of Rs.1/- each) (for continuing and discontinued operations) | | | | | | |
| Basic: (in Rs.) | -1.35 | 8.03 | 2.75 | -5.86 | -4.50 | 0.50 |
| Diluted: (in Rs.) | -1.35 | 8.03 | 2.75 | -5.86 | -4.50 | 0.50 |

Notes:
a) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchanges website (www.bseindia.com, www.nseindia.com) and on the Company website (www.thirumalaichemicals.com).
b) The Audit Committee has reviewed and the Board of Directors have approved the above results at their respective meetings held on 14 August 2025.

For and on behalf of the Board of Directors of
THIRUMALAI CHEMICALS LIMITED
Sd/-
RAMYA BHARATHRAM
MANAGING DIRECTOR AND
CHIEF FINANCIAL OFFICER
DIN: 06367352

Place : Chennai
Date : 14 August 2025


# सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी 'एसआयटी' नेमा

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीतील मृत्यू प्रकरणात विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावी, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी व न्या. संजय देशमुख यांनी गुरुवारी पोलिस महासंचालकांना दिले आहेत. याप्रकरणी सूर्यवंशी यांची बाजू मांडताना यापूर्वी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयाने विशेष तपास पथक स्थापन करावे, अशी विनंती केली होती.

या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत, असे याचिकाकर्त्या विजया सूर्यवंशी यांच्या वतीने खंडपीठाला सांगण्यात आले. त्यावर सरकारी वकिलांनी सांगितले की, या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने सुधारित दिलेल्या आदेशानुसार याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खंडपीठात सरकारकडून निवेदन करताना सांगण्यात आले की, सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडून सुरू आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या न्यायालयाने विशेष तपास पथक नियुक्त करावे, या विनंतीवरून सरकारकडून सांगण्यात आले की, बदलापूर प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने पोलीस महासंचालकांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश होते. त्यानुसार पोलीस महासंचालकांनी पथक स्थापन केले होते. या प्रकरणातही खंडपीठाने पोलीस महासंचालकांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजया सूर्यवंशी यांनी याचिका दाखल केली असून, त्यांच्या वतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी, तर राज्य शासनाकडून मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी बाजू मांडली.

### पोलिस महासंचालकांना आदेश





## ग्रोअर ॲन्ड वाईल (इंडिया) लिमिटेड

GROWEL SINCE 1957
नोंदणीकृत कार्यालय: आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१
CIN - L74999MH1957PLC010975

### ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी आर्थिक निकालांचे विवरणपत्र

(₹ लाखांमध्ये)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र निकाल | | | | एकत्रित निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समाप्त तिमाही | | | समाप्त वर्ष | समाप्त तिमाही | | | समाप्त वर्ष |
| | | ३०-जून-२०२५ | ३१-मार्च-२५ | ३०-जून-२०२४ | ३१-मार्च-२५ | ३०-जून-२०२५ | ३१-मार्च-२५ | ३०-जून-२०२४ | ३१-मार्च-२५ |
| | | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | कामकाजातून एकूण उत्पन्न | २४,९३२ | ३३,७९७ | २६,१७९ | ११२,७५६ | २५,३२६ | ३४,०११ | २६,४०९ | ११३,३६९ |
| २ | कराच्या आधीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा | ५,८४४ | ३,४४० | ६,६७० | २०,९४५ | ५,८४० | ३,४३५ | ६,६६८ | २०,९५९ |
| ३ | करानंतर कालावधीसाठी निव्वळ नफा | ४,३६५ | २,५७७ | ५,०७० | १५,७०० | ४,३६१ | २,५७४ | ५,०७१ | १५,७१८ |
| ४ | या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतरच्या कालावधीसाठी नफा समाविष्टीत आहे आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न करानंतर) | ४,२४८ | २,५९१ | ५,०२४ | १५,६५२ | ४,२४४ | २,५९१ | ५,०२५ | १५,६७३ |
| ५ | इक्विटी शेअर भांडवल | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ | ४,५३४ |
| ६ | प्रत्येकी शेअर उत्पन्न (प्रत्येक ₹ १/- किंमतीचे) - | | | | | | | | |
| | (१) बेसिक | ०.९६ | ०.५७ | १.१२ | ३.४६ | ०.९६ | ०.५७ | १.१२ | ३.४७ |
| | (२) डायल्यूटेड | ०.९६ | ०.५७ | १.१२ | ३.४६ | ०.९६ | ०.५७ | १.१२ | ३.४७ |

टीप:
१. वरील निकालांचे पुनरावलोकन लेखापरीक्षण समितीने केले आणि १३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते रेकॉर्डवर घेतले.
२. हे विवरण कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या कंपनी (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ (इंडियन एएस) आणि लागू असलेल्या मर्यादिपर्यंत इतर मान्यताप्राप्त लेखा धोरणांनुसार तयार केले आहे.

मंडळाच्या आदेशानुसार
संपादित/-
निरजकुमार मोर
व्यवस्थापकीय संचालक

स्थळ: मुंबई
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२५